सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासुली/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज 392 ठ. क्र. 308 दि. 21/12/16 रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

३१२

नवीन जन्नतुल फिरदोस मुस्लीम कब्रस्तान येथे रस्ता डांबरीकरण करणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव विषयांकित कामाचे सविस्तर पूर्वगणनपत्रक क्र. ६१/२०१६-१७ र.रु. ७२,५२,२२५/- यांस व सदरकामी येणारा खर्च सन २०१६-१७ या आर्थिक वर्षातील भांडवली कामे अंतर्गत रस्ते बांधणे या सदरी बजेट तरतूद उपलब्ध होऊन मिळणेकामी मा. आयुक्त यांचे दि. ७-१२-१६ चे टिपणीप्रमाणे आलेल्या प्रकरणाचे अवलोकन केले.

पुर्वगणनपत्रकास मान्यता देणेत येत आहे. याकामी सन २०१६-१७ भांडवली कामाअंर्तगत स्मशानभुमी सुधारणा करणे या सदरी तरतूद करणेस मान्यता देणेत येत आहे

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. ३१३ ठ. क्र. ३०५ दि. २९/१२/१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



मा. शासन पुरस्कृत रमाई आवास योजने अंतर्गत अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांसाठी घरकुल योजनेअंतर्गत बांधकाम परवानगी मिळणेबाबत प्रस्तावात सविस्तर माहिती नमूद असून, प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे विषयांकित प्रकरणी मा. शासन निर्णय दि. ९-३-२०१० मधील दि. १-१-१९९५ या दिनांकास राज्यशासन/स्थानिक स्वराज्य संस्था/खाजगी मालकीच्या जमिनीवर अतिक्रमण करुन रहात असलेल्या आणि संरक्षित झोपडीदार म्हणून संरक्षण पात्र लाभार्थ्यांना आहे त्याच जागेवर घर बांधण्यास मंजूरी देण्यात यावी या शासनाच्या धोरणानुसार कार्यवाही ठेवणेकामी धोरणात्मक मान्यतेसाठी मा. सर्वसाधारण सभेकडे पाठविणेकामी मा. आयुक्त यांचे दि. ७-१२-१६ चे टिपणीने आलेल्या प्रकरणाचे अवलोकन केले.

शहरातील २२० झोपडपट्टयापैकी १६९ झोपडपट्टया या खाजगी जागेवर वसलेल्या असून, या घोषित व अघोषित झोपडपट्टयाचाही यामध्ये समावेश करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका.

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.३१४ ठ. क्र. ३०६
दि. २१/१२/१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमति पास झाला.

३१४

प्र.क्र. ११ शेटे वस्ती पुल ते विद्युत नगर नाल्यापर्यंत आर.सी.सी. स्टॉर्म ड्रेनेज लाईन घालणेचे कामाबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव विषयांकित कामाचे फेर पूर्वगणनपत्रक क्र. ६१/१६-१७ र.रु. ५०,९६,५८७/- चे असून सदरकामी र.रु. ३३,७८,६१२/- इतकी तरतूद असून उर्वरीत वाढीव र.रु. १७,१७,९८५/- इतकी तरतूद होऊन मिळणेस्तव सदर कामाचे फेर पूर्वगणनपत्रक क्र. ५०/२०१६-१७ र.रु. ५०,९६,५८७/- यांस मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेकामी मा. आयुक्त यांचे दि. २७-१०-१६ चे टिपणीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

सन २०१७-१८ मधील अंदाजपत्रकात तरतूद करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज 395...ठ. क्र....306
दि..29/12/16....,रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

३१५

राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियानांतर्गत बेघराचा निवारा बांधण्याकरिता लाभार्थी व जागेला मंजूरी मिळणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव व प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे प्रामुख्याने कुष्टरोगी यांच्याकरिता नविन निवारा बांधकामास सर्वसाधारण सभेची मंजूरी व बैठकीचे इतिवृत्त, निवारा, देखभाल व व्यवस्थापन समिती स्थापना व मंजूर, निवारा बांधकामासाठीचे जागा मालकीचे ७/१२ उतारा, निवा-याची क्षमता व इतर साहित्य खरेदीबाबत तपशील इत्यादीबाबत पूर्तता करणेकामी तत्वत: प्रस्ताव मान्यतेबाबत नगरपरिषद संचनालय, वरळी मुंबई कडे पाठविण्यांत आले होते. त्यास अनुसरुन जागेच्या उता-यासह नियोजन आराखडा (Plan Estimate) कार्यकारी समितीमधील कुष्टरोग्याचे मंजूर इतिवृत्त, देखभाल व व्यवस्थापन गठीत तपशीलासह नगरपरिषद संचनालय वरळी मुंबई कडून मागणी करण्यांत आलेली आहे. तरी सादर मागणीप्रमाणे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन राज्यस्तरीय अंती मंजूरी होण्याकामी मा. सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव मा. आयुक्त यांचे दि. २८-११-१६ चे टिपणीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकच्या तहकूब/मासिक/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. तात-६/३५७ ठ. क्र....३०८ दि.२९/१२/१६...रोजी ठेवला असता प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

तात-६/३५७

शहर सोलापूर मौजे मजरेवाडी नविन स.नं. १४/१ब जुना स.नं. २७५/१ब होटगी रोड या जागेतील आरक्षण क्र. १३/७८ (गार्डन) जागेबाबत म.प्रा. व न.र.अधिनियम १९६६ चे कलम १२७ नुसार प्रस्तावात नमूद कारणास्तव व नमूद केलेप्रमाणे संदर्भीय अर्जदार यांनी एफ.एस.आय. अथवा टी.डी.आर.ची मागणी केलेली नसल्याने विषयांकित जागेतील विकास योजनेनुसार असलेला आरक्षण क्र. १३/७८ गार्डन व्यपगत होऊ नये यादृष्टीने विकास योजनेतील आरक्षण क्र. १३/७८ जागेचे भूसंपादन करणे क्रमप्राप्त आहे. याकरिता भूसंपादनाचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी यांचेकडे सादर करणेस तसेच भूसंपादनाकरिता सन २०१५ च्या शासकीय शिघ्रसिध्दगणकानुसार अंदाजे र.रु. ३,०९,९५,५२०/- (अक्षरी रक्कम रुपये तीन कोटी नऊ लाख पच्याणव हजार पाचशे वीस फक्त) इतके रक्कम लागू शकते. सदरच्या रक्कमेत प्रत्यक्षात भूसंपादनाच्या वेळेस फरक पडू शकेल तरी र.रु. ३,०९,९५,५२०/- इतके बजेट तरतूद उपलब्ध होऊन मिळणेस्तव प्रकरण मा. सर्वसाधारण सभेच्या मान्यतेकरिता मा. सर्वसाधारण सभेपुढे सादर करणेकामी मा. आयुक्त यांचे दि. ९-१२-१६ चे टिपणीने आलेले प्रकरणाचे अवलोकन केले.

संपूर्ण माहीतीसह प्रकरण फेरसादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासलो/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. तात-७/३५८ ठ. क्र. ३०९ दि.२९/१२/१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

तात-७/३५८

शहर सोलापूर मौजे बाळे हद्दीतील गट क्र. २४/१+२/C/२B/२ (पै) व गट क्र. २६/४ आ.क्र. ११/७२ प्ले ग्राऊंडचे जागेबाबत म.प्रा. व न.र.अधिनियम १९६६ चे कलम १२७ नुसार प्रस्तावात नमूद कारणास्तव व नमूद केलेप्रमाणे संदर्भीय अर्जदार यांनी ११/७२ प्ले ग्राडंडचे क्षेत्र १४३१२ चौ.मि. जागेबाबत एफ.एस.आय. अथवा टी.डी.आर.ची मागणी केलेली नसल्याने विषयांकित जागेतील विकास योजनेनुसार असलेला आरक्षण क्र. ११/७२ प्ले ग्राऊंडची जागा व्यपगत होऊ नये यादृष्टीने विकास योजनेतील आरक्षण क्र. ११/७२ जागेचे भूसंपादन करणे क्रमप्राप्त आहे. याकरिता भूसंपादनाचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी यांचेकडे सादर करणेस तसेच भूसंपादनाकरिता सन २०१५ च्या शासकीय शिघ्रसिध्दगणकानुसार अंदाजे र.रु. १,३१,६७,०४०/- (अक्षरी रक्कम रुपये एक कोटी एकतीस लाख सदुसष्ट हजार चाळीस फक्त) इतके रक्कम लागू शकते. सदरच्या रक्कमेत प्रत्यक्षात भूसंपादनाच्या वेळेस फरक पडू शकेल तरी दरम्यान र.रु. १.३२ कोटी इतके बजेट तरतूद उपलब्ध होऊन मिळणेस्तव प्रकरण मा. सर्वसाधारण सभेच्या मान्यतेकरिता मा. सर्वसाधारण सभेपुढे सादर करणेकामी मा. आयुक्त यांचे दि. ९-१२-१६ चे टिपणीने आलेले प्रकरणाचे अवलोकन केले.

संपूर्ण माहितीसह प्रकरण फेर सादर करण्यास मान्यता देणेत येत आहे

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. तात-८/३५९ ठ. क्र. ३९०
दि. २१/१२/१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

तात-८/३५९

शहर सोलापूर हद्दवाढ येथील आ.क्र.१२/५४ स्विमींगपूल स.नं.६/१,७ आणि ८/१अ या जागेतील म.प्रा. व न.र.अधिनियम १९६६ चे कलम १२७ बाबत (क्षेत्र - ८६००.०० चौ.मि.) प्रस्तावात नमूद कारणास्तव व नमूद केलेप्रमाणे संदर्भीय अर्जदार यांनी एफ.एस.आय. अथवा टी.डी.आर.ची मागणी केलेली नसल्याने विषयांकित जागेतील विकास योजनेनुसार असलेली जागा व्यपगत होऊ नये यादृष्टीने विकास योजनेतील जागा भूसंपादन करणे क्रमप्राप्त आहे. तसेच भूसंपादनाकरिता सन २०१६ च्या शासकीय शिघ्रसिध्दगणकानुसार अंदाजे र.रु. २,०१,२४,०००/- (अक्षरी रक्कम रुपये दोन कोटी एक लाख चोवीस हजार फक्त) इतके रक्कम लागू शकते. सदरच्या रक्कमेत प्रत्यक्षात भूसंपादनाच्या वेळेस फरक पडू शकेल तरी र.रु. २,०१,२४,०००/- इतके बजेट तरतूद उपलब्ध होऊन मिळणेस्तव प्रकरण मा. सर्वसाधारण सभेच्या मान्यतेकरिता मा. सर्वसाधारण सभेपुढे सादर करणेकामी मा. आयुक्त यांचे दि. ९-१२-१६ चे टिपणीने आलेले प्रकरणाचे अवलोकन केले.

संपूर्ण माहितीसह प्रकरण फेर सादर करण्यास मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकच्या तहकब/मासूली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज तात-९ ३६० ठ. क्र......३९९
दि.२१।१२।१६.....रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

**तात-९/३६०**

शहर सोलापूर हद्दवाढ भाग येथील केगांव शिवाजी नगर स.नं.२८ आ.क्र. ११/१९ स्विमींपूल पिकनिक स्पॉट तलावाचे आरक्षण या जागेतील म.प्रा. व न.र.अधिनियम १९६६ चे कलम १२७ बाबत (क्षेत्र - १२३९०० चौ.मि.) प्रस्तावात नमूद कारणास्तव व नमूद केलेप्रमाणे संदर्भीय अर्जदार यांनी एफ.एस.आय. अथवा टी.डी.आर.ची मागणी केलेली नसल्याने विषयांकित जागेतील विकास योजनेनुसार असलेली जागा व्यपगत होऊ नये यादृष्टीने विकास योजनेतील जागा भूसंपादन करणे क्रमप्राप्त आहे. तसेच भूसंपादनाकरिता सन २०१६ च्या शासकीय शिघ्रसिध्दगणकानुसार अंदाजे र.रु. १२,३९,००,०००/- (अक्षरी रक्कम रुपये बारा कोटी एकोणचाळीस लाख फक्त) इतके रक्कम लागू शकते. सदरच्या रक्कमेत प्रत्यक्षात भूसंपादनाच्या वेळेस फरक पडू शकेल तरी र.रु. १२,४०,००,०००/- इतके बजेट तरतूद उपलब्ध होऊन मिळणेस्तव प्रकरण मा. सर्वसाधारण सभेच्या मान्यतेकरिता मा. सर्वसाधारण सभेपुढे सादर करणेकामी मा. आयुक्त यांचे दि. ९-१२-१६ चे टिपणीने आलेले प्रकरणाचे अवलोकन केले.

संपूर्ण माहितीसह प्रकरण फेर सादर करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालि.

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.अ तात-१० ३६१ ठ. क्र....392 दि.29.12.16.....रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

**तात-१०/३६१**

सोलापूर महानगरपालिका सोलापूरचे सन २०११-१२ या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण अहवालाचे मुंबई स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम १९३० चे कलम १० (१) अन्वये प्रथम अनुपालन अहवाल मा. महासभेपुढे सादर करणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव व प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे सोलापूर महानगरपालिकेतील विविध खात्याचे १५८ परिच्छेदाचे अनुपालन अहवालावर मा. प्र. आयुक्त यांची स्वाक्षरी झालेली असल्याने महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम १९३० चे कलम १० (१) व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०७ अ प्रमाणे मा. महासभेपुढे मंजरीस्तव सादर करणेकामी मा. आयुक्त यांचे दि. १७-१२-१६ चे टिपणीने आलेले प्रकरणास खालील बदलास अनुसरून मान्यता देणेत येत आहे

नगरसचिव कार्यालयाकडून अनुपालन अहवाल अलहिदा सादर करण्यात आलेले असून त्यांचा ही विचार व्हावा लेटरपॅड, दूरध्वनी ही छपाई, स्टेशनरी केवळ मा.महापौर,मा.उपमहापौर.मा.अध्यक्ष स्थायी समिती,मा.विरोधी पक्ष नेते,मा.सभागृह नेते, झोन समितीचे एकूण ८ झोन अध्यक्ष तसेच ७ विशेष समित्यांचे सभापती या पदाधिका-यांना स्वतंत्र्य असे कार्यालय देण्यात आले असून सदर कार्यालयात दूरध्वनी व्यवस्था ,लेटरपॅड , स्टेशनरी इत्यादी सुविधा केवळ कार्यालय उपलब्ध करून दिल्याने करण्यात आलेले असून तसेच त्या त्या समिती मधील सदस्यांना त्या त्या कार्यालयातून आवश्यक तो पत्र व्यवहार करता यावा त्यासाठी त्या कार्यालया करिता लेटरपॅड,दूरध्वनी उपलब्ध करून देण्यात आले आहे. ही बाब विचारात घेता नगरसचिव कार्यालय करिता काढणेत आलेले आक्षेप वगळण्यास मान्यता देण्यात येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.३९६ ठ. क्र....३९३
दि.२१/१२/१९९६....रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



प्र.क्र. २० अ मधील कोंडानगर ते चेतन हॉटेलकडे जाणा-या रस्त्यास **ई.आर.टी. मार्ग (ERT)** असे नामकरण करुन नामफलक लावणेस येणा-या खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका